PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 7, ISSUE 1

# व्यावसायिक व्यवस्थापन आणि नियोजन यांमधील कच्चे दुवे आणि पळवाटा यांचे अवलोकन : एक तर्कशुध्द विचार

**डॉ. विनय भोळे**
माजी प्राचार्य, प्राध्यापक
मॉडेल कॉलेज ऑटोनॉमस,
डोंबिवली. महाराष्ट्र भारत

महाभारत युद्धात विलक्षण युद्धकौशल्य व असामान्य कर्तृत्व अंगी असूनही ते दाखवू न शकलेला महान योद्धा म्हणजे बर्बरिक. अहिल्यावती नामक नागवंशीय राजकुमारीचा हा सुपुत्र अनेक दैवी शक्ती व असामान्य युद्धकौशल्यानं वरदान प्राप्त योद्धा होता. त्याच्या पित्याप्रमे, म्हणजे घटोत्कचाप्रमाणे मायावी विद्या व आजोबा भीमाप्रमाणे महापराक्रमी बर्बरिकानं घोर तपश्चर्या करून अग्नीकडून दिव्य धनुष्य व भगवान शंकराकडून तीन बाण प्राप्त केले होते. त्यातील प्रत्येक बाण एकदा सुटला की असंख्य योध्यांचा जीव घेऊन बर्बरिकाच्या भात्यात परत विसावणार होता. बर्बरिकला बर्बरिकाला एखादा समुदाय शत्रू वाटल्यास व त्यावर बाण सोडल्यास बार्बरीकाच्या नकळत बाण सगळ्यांना संपवू शकणार होता. बार्बरीकाना नं महाभारताच्या युद्धात भाग घेण्याची तीव्र इच्छा आपल्या आईकडे बोलून दाखवली, तेव्हा अहिल्यावतीनं

त्याच्याकडे वचन मागितलं. खरं तर बर्बरीकाचे तीन दिव्य बाण संपूर्ण युद्धाचा निर्णय काही क्षणात लावू शकत होते. परंतु, आईला दिलेल्या वचनाप्रमाणे तो केवळ हरणाऱ्या पक्षाकडे राहूनच युद्ध करणार होता.

विलक्षण आत्मविश्वास व काहीसा मागचा पुढचा विचार न करता कोणालाही आव्हान देण्याची त्याची प्रवृत्ती त्याला घातक ठरेल याची त्याला कल्पना नव्हती. केवळ तीन दिव्या बाण घेऊन महाभारताच्या रणांगणावर बर्बरिका नं तो नेमका कोणाच्या पक्षातून लढणार आहे, हे शेवटपर्यंत सांगितलंच नव्हतं. कौरव की पांडव यांपैकी कोणता पक्ष त्याचा हे त्यानं स्पष्ट केलं नव्हतं. अर्थातच, त्यामुळे तो लक्षात येण्याजोगा योद्धा नक्कीच ठरला होता. त्याला कौरव पांडव यांच्यापेक्षा स्वतःचं बळ दाखवणं महत्वाचं वाटत होतं. आत्मस्तुती करणं बर्बरिकला समाधान देत होतं. श्रीकृष्णानं युद्धापूर्वीच समस्त योध्यांना असं विचारलं होतं की, हे युद्ध एकूण किती दिवस चालेल ? भीष्मांच्या मतानुसार ते २० दिवस, द्रोणाचार्यांच्या अंदाजानुसार २५ दिवस, कर्ण म्हणत होता २४ दिवस तर अर्जुनाचा अंदाज होता २८ दिवस हे युद्ध चालेल. विविध योद्धे अणे शक्यता वर्तवत होते. बर्बरिक मात्र गर्वानं म्हणाला होता, फक्त काही क्षण. पण तो तेवढ्यावर थांबला नव्हता. कौरव पांडवांसमोर मोठ्या आढ्यतेने तो कृष्णाला म्हणाला होता, "माझ्या भात्यात केवळ तीन बाण आहेत. ते केवळ बाण नसून ती महासंहारक अस्त्रं आहेत. एका बाणानं सारे कौरव, दुसऱ्या बाणानं सारे पांडव आणि तिसऱ्या बाणानं मी श्रीकृष्णाला ठार मारू शकतो."

व्यवस्थापन शास्त्राचा सरळ सोपा संकेत आहे की, कधीही स्वतःची माहिती पूर्णपणे उघड करू नये. वृथा वल्गना तर कधीच करू नयेत. (Never open all your cards) कारण अशा वल्गना खऱ्या की खोट्या हे तपासण्याचं काम भगवान श्रीकृष्णासारखे कुशल व्यवस्थापन तज्ज्ञच करीत असतात. त्यामुळे प्रतिस्पर्धी सावध

होऊन युद्धकौशल्य म्हणजे आजच्या काळातले वैयक्तिक कौशल्य सर्वांपुढे येण्यापूर्वीच ते संपवण्याची योग्य संधी शोधत असतात. त्यामुळे योध्यानं समोर युद्धस्थिती दिसल्याशिवाय क्षमता सिद्ध करण्याच्या फंदात पडू नये. मोठमोठ्या वल्गना करणाऱ्या बॉब विलिस या गोलंदाजाच्या भारतीय खेळांडूवरच्या टीकेला तोंडाची वाफ न दवडता झुंझार संदीप पाटीलनं त्याच्या एकाच षटकात सहा चौकार मारून कोण काय आहे ते दाखवून दिलं होतं. कदाचित बॉब विलीस काही वेडं वाकडं बोलला नसता तर त्याच्या गोलंदाजीची अशी धुलाई करण्याची इच्छा संदीप पाटीलला झाली नसती व पत्रकारांनी नंतर बॉब विलिसची जी खिल्ली उडवली ती वेळही विलिसवर आली नसती.

अशामुळे विलिसचं मोठेपण कमी कमी होत नाही. पण त्याला अहंकाराचा जो वर वारा स्पर्शून गेला, त्यापायी ही बदनामी त्याला स्वीकारावी लागली. प्रतापगडावर भेटीपूर्वी शूर व तितकेच चतुर असलेल्या शिवरायांनी अफजलखानाला कमी न लेखता चिलखत घातलं होतं हे विसरता येणार नाही. याउलट अतिशय सशक्त असलेल्या अफजल खानानं मात्र अहंकारामुळे चिलखत अथवा संरक्षणाचे अन्य मार्ग निवडले नव्हते. आणि अगदी अलीकडचं उदाहरण द्यायचं तर योग गुरु राम देव बाबांची खिल्ली उडवणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांना तरी कुठे माहिती होतं की, उद्या हीच सामान्य वाटणारी व्यक्ती आपली क्रमांक एकची प्रतिस्पर्धी होणार आहे. खरं तर बार्बरीकानं अशी कोणतीही वल्गना आणि ती देखील श्रीकृष्णासमोर करायलाच नको होती. अशा आव्हानांमुळे समोरच्या सक्षम व्यक्ती काहीही कारण नसताना दुखावल्या जातात आणि प्रसंगी कठीण वाटणारं आव्हानही खुल्या दिलानं स्वीकारतात. ते आव्हान स्वीकारणं मग आव्हान देणाऱ्याचा सर्वनाश करणारं ठरतं.

बर्बरीकाच्या वल्गनेची सत्यता पडताळून पाहण्यासाठी श्रीकृष्णानं त्याला कमी न लेखता व त्याच्या बाणाची एकाच वेळी अनेक लक्ष्यांवर मारा करण्याची क्षमता तपासून पाहायचं ठरवलं. श्रीकृष्ण म्हणाला, "बर्बरिक, तू खरोखरंच दिव्य धनुर्विद्या जाणत असलास, तर समोरच्या वट वृक्षाची सगळी पानं तुझ्या बाणानं नष्ट करून दाखव." असं म्हणताना खरं तर श्रीकृष्णानं त्या झाडाच्या जमिनीवर गळून पडलेल्या एका पानावर पाय ठेवला होता. बर्बरीकानं सर्वांसमोर वाट वृक्षावर बाण सोडला आणि आश्चर्य म्हणजे त्याच्या एकाच बाणानं त्या विशाल वृक्षाच्या सगळ्या पानांचा वेध घेतला. पण तो बाण श्रीकृष्णाच्या पायाखाली लपवलेल्या पानाचा वेध घेण्यासाठी मग घोंघावू लागला. श्रीकृष्णाचं ते लगेच लक्षात आलं.

बर्बरिकाचं ते असामान्य कौशल्य पाहून श्रीकृष्णानं त्याला विचारलं, तू कोणाच्या बाजूनं लढणार. त्यावर माता अहिल्यावतीच्या वचनाला जागून तो म्हणाला, हरणाऱ्या पक्षाच्या बाजूनं मी लढणार. याचं एक कारण असं असावं की, कमजोर पक्षाची बाजू घेतल्याखेरीज बर्बरीकाला त्याचं श्रेठत्व सिद्ध करताच येणार नव्हतं. ती परिस्थितीची अपरिहार्यता होती.

बर्बरिक ज्या पक्षात असेल तो पक्ष साहजिकच प्रबळ होणार व तात्काळ तो पक्ष बदलून समोरच्या हरणाऱ्या पक्षात जाणार आणि पुन्हा लगेचच पारडं बदलून हरणारा पक्ष विजयी होण्याच्या मार्गावर जाणार व लगेचच बर्बरिक पुन्हा पक्ष बदलणार. असं जर कायम होत राहिलं आणि बर्बरिक जर सतत पक्ष बदलत राहिला तर युद्धाचा निर्णय कधीच लागणार नाही आणि त्याच्या बाणांपासून पांडवांचं रक्षण करणं तर आवश्यकच होतं. श्रीकृष्णाच्या कुशाग्र बुद्धिचातुर्यानं भविष्यातील सर्व शक्यतांचा वेध घेतला होता.

व्यवस्थापकांनी आपल्या क्षमतेचा लेखाजोखा चतुर व चाणाक्ष स्पर्धकांसमोर मांडला की, बर्बरिकासारखी माणसंही फसतात. कारण त्यांचे प्रतिस्पर्धी त्यांचा पाडाव करण्याची तयारी ताबडतोब सुरु करतात. श्रीकृष्ण लगेचच बर्बरीकाला म्हणाला, "मी एका योध्यासमोर असहाय ठरलो आहे. माझी मदत तू करू शकशील का?" कोणत्याही असहाय व हरू पाहणाऱ्या माणसाला मदत करण्याचा बर्बरिकाचा पण होता. तो लगेचच म्हणाला, "श्रीकृष्णा, तू असहाय आहेस, म्हणजे आता तुला मदत करायलाच हवी. तू फक्त सांग, कुठे आहे तुझा तो शत्रू योद्धा. मी तात्काळ त्याची हत्या करतो."

बर्बरीकाच्या आश्वासक वाक्यावर क्षणाचीही उसंत न घेता श्रीकृष्णानं म्हटलं," मला या योध्याचं शिर आणून दे." त्याक्षणी श्रीकृष्णानं बर्बरिकच्या चेहऱ्यासमोर आरसा धरला. आपल्याला श्रीकृष्णानं चातुर्यानं बोलण्यात अडकवलं आहे, याची बार्बरीकाला जाणीव झाली. परंतु, आता उशीर झाला आहे, हेही त्याच्या ध्यानात आलं. सर्वांसमक्ष तो श्रीकृष्णाला वचन देऊन चुकला होता. त्यानं आपलं शिर कापून श्रीकृष्णाला अर्पण केलं. अशा प्रकारे श्रीकृष्णानं कृष्णनीती वापरून एका महान योध्याचा युद्ध सुरु होण्यापूर्वीच त्याच्या स्वतःच्या हाती वध करवून आपला कार्यभाग साधला.

समयसूचकता, प्रतिस्पर्ध्याला अहंभावाचा अभ्यास, परिस्थितीचं अवलोकन व परस्पर काट्यानं काटा काढणं या गुणांमुळे श्रीकृष्णानं बर्बरिका ला संपवलं. अगदी असंच कार्पोरेट जगतातही घडतं. प्रतिस्पर्धी कंपनीच्या क्षीण स्थानांचा वेध घेऊन फार शक्ती व वेळ वाया न घालवता तिचा पाडाव करता येतो. जरासंध, शल्य, कर्ण, भीष्म, जयद्रथ, द्रोणाचार्य, दुर्योधन यांच्या

शतिस्थानां चा अभ्यास करून श्रीकृष्णानं युक्तीनं फार कष्ट न घेता त्यांचा अडसर वाटेतून दूर केला होता.

केरळ व आंध्र प्रदेशात बोली व मौखिक कथांमध्ये बर्बरिकाचा उल्लेख आजही मोठ्या आदरानं केला जातो. राजस्थानात हरणाऱ्या पक्षाला दिलासा देणाऱ्या बर्बरिकाची आराधना खटूशामजी नावानं केली जाते. असामान्य सामर्थ्य असलेला बर्बरिक विशेष कोणाला माहिती नाही. सर्व सामान्यांना ज्ञात असलेल्या महाभारत कथांमध्येही त्याला स्थान नाही. कारण विलक्षण कृष्ण नीतीसमोर बर्बरिक कायमचा निष्प्रभ ठरला गेला.

The Good, the Bad and the Ugly या इंग्रजी चित्रपटात नायकाला बाथटब मध्ये अंघोळ करताना मारण्याच्या उद्देशानं खलनायक बाथ रूमच्या दाराशी उभा राहून हातात रिव्हॉल्व्हर घेऊन बरंच काही बोलतो. अंघोळ करणाऱ्या असहाय हिरोला पाहून त्याला ठार मारण्यापूर्वी खलनायाकाचा अहंकार जागृत होतो. मोठ्या अहं मान्य ततेतून तो बडबडत असतानाच पाण्याखाली दोन्ही हातात रिव्हॉल्व्हर पकडलेला नायक त्याला गोळ्या घालतो आणि म्हणतो, “When you want to shoot, shoot! Don’t tell I will shoot you.” शक्तीचं प्रदर्शन करणं बर्बरिकाच्या बाबतीत धोक्याचं ठरलं आणि त्या खलनायकाच्या बाबतीतही.

## संदर्भ:

१. प्राचीन चरित्रकोश - म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, भारतीय चरित्रकोश मंडळ, शिवाजीनगर, पुणे- ४, १९६४.

२. महाभारताची चिकित्सक आवृत्ती खंड १ ते २२- भांडारकर प्राच्यविद्या संस्था, भांडारकर मार्ग, पुणे - ४.

३. महाभारताची गूढ रहस्ये : कवीश्वर ३४, जानकीनगर, इंदोर (मध्य प्रदेश )- ४५२००१.

४. महाभारताचा उपसंहार : ले. भारताचार्य चिं. वि. वैद्य - वरदा प्रकाशन, सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११ ०१६.

५. श्रीकृष्णचरित्र: ले. भारताचार्य चिं. वि. वैद्य - वरदा प्रकाशन, सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११ ०१६.

६. महाभारत : संपादन - प्रा. न. र. फाटक

७. महाभारत : संपादन - प्रा. भालबा केळकर

८. व्यासपर्व : दुर्गा भागवत, मौज प्रकाशन, गिरगाव, मुंबई - ४, आवृत्ती १९६२.

९. गर्गसंहिता - भांडारकर इन्स्टिटयूट - पुणे - ४.

१०. हरीवरदा : श्रीकृष्ण कोपर्डेकर, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, २७३, शनिवार पेठ, पुणे- ४११०३०.